अग्रलेखांचा नवा काल बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काल

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काल बादशहा

# दृष्टीविषयी सरकारची हीनदृष्टी

डोळे किंवा नेत्र नसलेल्या माणसाला दृष्टिहीन म्हटले जाते. परंतु ते तितकेसे योग्य नाही. तो दृष्टिहीन नसतो. डोळे नसूनही तो अनेक गोष्टी पाहात असतो, अनुभवत असतो. दृष्टी ही केवळ डोळ्यांशी संबंधित बाब नव्हे, तर विचारांशी भावनेशीसुध्दा तितकाच घनिष्ट संबंध असतो. अशा नेत्रहीन लोकांकडे दृष्टिवानांपेक्षा काही वेळा दृष्टी असू शकते. परंतु एकूणच सगळ्या समाजाचा, मुनष्य जीवनाचा विचार केला तर कोणीही नेत्रहीन दृष्टीहीन असू नये. समाजातल्या अधिकाधिक व्यक्ती अव्यंग म्हणजेच सुदृढ असणे केव्हाही चांगले असते. आज आपल्या भारतात अशा नेत्रहीनांची संख्या प्रचंड आहे. जगातला भारत हा नेत्रहीनांचा दुसऱ्या क्रमांकावरचा देश आहे. तब्बल ३ कोटी नेत्रहीन लोक भारतात आहेत. आज जागतिक नेत्रदिन दिवसाच्या निमित्ताने या गोष्टीचा विचार करताना भारतात जगातील सर्वाधिक नेत्रहीन लोक असावेत याची वेदना जाणवल्याशिवाय राहात नाही. जागतिक आणि आपल्या देशपातळीवर अंधत्वविरोधात उपाययोजना आणि नेत्रदानाबाबत जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. परंतु ते खूपच तोकडे आहेत. मुळात म्हणजे या अंधत्वविरोधात अधिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाययोजना होण्याची गरज आहे. अंधत्व येण्यामागची कारणे शोधली गेली पाहिजेत. समाजात जन्मजात अंधत्व असणाऱ्यांचे प्रमाण किती, त्यामागची कारणे काय आणि जन्मल्यानंतर अंधत्व येणाऱ्यांचे प्रमाण, त्याची कारणे शोधून एकूणच ही व्याधी उद्‌भवणारच नाही असे काही करता येईल का, याचा विचार व्हायला हवा. भारतापुरता विचार केला तर जन्मजात अंधत्वापेक्षा वयाच्या विशिष्ट टप्प्यावर अंधत्व येणाऱ्यांचे किंवा दृष्टिहानी होणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे मानले जाते. समाजातला एक मोठा वर्ग नेत्रहीन राहावा हे योग्य नाही. आज समाजात अपंगत्व नाहीसे करण्यासाठी अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवर एकत्रितपणे प्रयत्न सुरू आहेत. पोलिओ लस देण्याची मोहीम भारतासह जगातल्या अनेक देशात राबविली जाते. जन्मल्यानंतर वयाच्या विशिष्ट कालावधीत पोलिओ डोस देऊन पुढे येणारे अपंगत्व टाळण्याचा उपाय किंवा उपचार मात्र उपलब्ध झाला आहे. तसा नेत्रहीन किंवा अंधत्व टाळण्यासाठी करता येणार नाही का, त्याबाबत योग्य ती लोकजागृती करता येऊ शकते. भारताचा जर जगात नेत्रहीन व्यक्तिंच्या संख्येत पहिला किंवा दुसरा क्रमांक लागत असेल, तर याविरोधात अतिरिक्त गांभिर्याने मोहीम आखली जायला हवी. सरकारी पातळीवर धोरणे तयार केली गेली पाहिजेत.

## नेत्रदानाविषयी जागृती हवी

भारतातल्या अंधत्वावर मात करण्यासाठी केवळ सामाजिक आणि राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. कारण जागतिक आरोग्य संघटनेसारख्या संस्थांचे असे म्हणणे आहे की, भारतातली ७५ टक्के समस्या दूर होऊ शकते. म्हणजे नीट उपाययोजना केली तर अंधत्व हे ७५ टक्क्यांनी कमी होऊ शकते. परंतु आज भारताची लोकसंख्या लक्षात घेतली तर ४० हजार नेत्रतज्ज्ञांची गरज आहे. पण आज केवळ २५ ते ३० हजारच चांगले नेत्रतज्ज्ञ उपलब्ध आहेत. भारतात अडीच लाख इतक्या वार्षिक नेत्रदानाची गरज आहे. पण केवळ २५ ते ३५ हजारच नेत्रदान होते. त्यातही २५ टक्के नेत्रांचा त्यातील दोषांमुळे उपयोग करता येत नाही. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भारतातले सर्वाधिक नेत्रतज्ज्ञ हे केवळ नेत्रतपासणीची कामे करतात. परंतु शस्त्रक्रिया करणाऱ्या नेत्रतज्ज्ञांची भारतात टंचाई आहे. ही सर्व आकडेवारी पाहिल्यानंतर भारतात एकूणच अंधत्व आणि नेत्रदान याबाबतीतला अंधार टाळण्यासाठी खूप आधीपासून उपाययोजना करता येईल. अगदी गर्भवती महिलेला आपलं मूल सुदृढ आणि अव्यंग जन्मणार असे वाटत असेल तर तिने कोणकोणता आहार घ्यावा. या काळात योग्य त्या जीवनसत्वांचे पोषण झाले तर निश्चितपणे नंतर उद्‌भवणाऱ्या अंधत्वावर मात करता येईल. अलीकडे गर्भसंस्कार किंवा गर्भवती महिलांच्या प्रबोधनाचे कार्यकाळ घेतात. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञसुध्दा या काळात महिलांना काय खावे, काय द्यावे, काय वाचावे, घरातले वातावरण कसे असावे, याविषयी मार्गदर्शन करीत असतात. याबरोबरीने लहान वयातच मुलांना सगळी जीवनसत्वे मिळतील असे भरण पोषण झाले पाहिजे. त्यांना योग्य ते वयात सांगितले पाहिजे. ज्या उपाययोजना सहजपणे करता येतील, ज्यासाठी कोणताही विशेष खर्च नाही ते उपाय करायला काहीच हरकत नाही. दुर्दैवाने आपल्याकडे आरोग्यविषयक अशी जागृती केली. केवळ औषध पाण्यावर भर दिला जातो. पण औषधाशिवाय पालेभाज्या गाजर, फळे यांच्या संवेदनातून डोळ्यांचे आरोग्य राखता येऊ शकते.

## भारताला फक्त १०८ नेत्रपेढ्या

जगातले सर्वाधिक नेत्रहीन लोक भारतात असूनही संपूर्ण देशात केवळ १०८ नेत्रपेढ्या आहेत. यावरून या समाजाकडे पाहण्याची उदासिनता स्पष्ट होते. किंवा दृष्टिहीनांकडे पाहण्याची सरकारची हीन दृष्टीसुध्दा त्यातून दिसून येते. आज अंधत्व असणाऱ्यांना मदत करणाऱ्या उपाययोजना केल्या जातात. त्यांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी म्हणूनही प्रयत्न होतात. अगदी अंधासाठी स्वतंत्र शाळा, वसतिगृहे, वाचनालये निर्माण झाली आहेत. नोकरी व्यवसायात त्यांच्यासाठी आरक्षणेही आहेत. ब्रेल लिपीपासून ते मोबाईलचा त्यांना सहजपणे वापर करण्यात यावा म्हणून नवे तंत्रज्ञान आले आहे. परंतु या सगळ्या उपाययोजनांबरोबर अंधत्व येणारच नाही अशा मूलभूत उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करण्याचीसुध्दा तेवढीच आवश्यकता आहे. अर्थात सरकार आणि समाज यांनी आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. अंधत्व असणारी व्यक्ती इतरांपेक्षा कोणत्याही बाबतीत मागे नसते. उलट तिची श्रवण इंद्रिये अधिक कार्यक्षम असतात. त्यांच्यात जिद्द आणि कष्ट करण्याचीही तयारी असते. त्यांना तुमच्या-आमच्यासारखे चर्मचक्षू नसतील. परंतु परिस्थितीचा अंदाज घेण्याचे अंतर्चक्षू किंवा ज्ञानचक्षू असतात. डोळे असणारा माणूस जी कामे करू शकणार नाही, त्यापेक्षा अनेक प्रकारे काम अंधव्यक्ती करू शकते. महाराष्ट्रातल्या विदर्भात गुलाबराव महाराज एक थोर विभूती होऊन गेली. जन्माला आल्यावर ८-१० महिन्यात त्यांना अंधत्व आले. परंतु त्यांनी दुसऱ्याला सांगून १२६ पुस्तके लिहून घेतली. ते कृष्णभक्त होते. ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या म्हणवून घेत. वेद उपनिषदं गीता व अनेक अभंगांचा त्यांनी ऐकून ऐकून अभ्यास केला आणि स्वतः शेकडो अभंग तयार केले. यावरून अंधत्वावर अशीही मात करता येतेच. परंतु एका सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर अंधत्व येणारच नाही अशा मूलभूत उपाययोजनेचाही विचार होणे आवश्यक ठरते.